अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासक्रम/ विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यांना मान्यता देणेबाबत.

12

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक :- मान्यता- २०२३/प्र.क्र. १०५/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १५ जून, २०२३.

**संदर्भ** : शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३.०९.२०१७.

**शासन आदेश**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ आणि संदर्भाधीन दि.१३.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासक्रम / विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करण्यात आली. विद्यापीठांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर केलेली छाननीनुसार पात्र ठरलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात सोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या एकूण १६६ नवीन अभ्यासक्रम/ विशेषस्तर विषय/ विषय, विवरणपत्र-ब मध्ये नमूद केलेल्या एकूण ७५ अतिरिक्त तुकडी आणि विवरणपत्र-क मध्ये नमूद केलेल्या एकूण १८ विद्याशाखा यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

२. **अटी व शर्ती :-**

१. सोबत जोडलेल्या विवरणपत्रात ज्या अनुदानित महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्या कायम विनाअनुदान तत्त्वावरील असल्याने सदर मान्यतेच्या अनुषंगाने अशा महाविद्यालयांना अनुदान तत्त्वावर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मागणि करता येणार नाही.

२. उपरोक्तप्रमाणे ज्या महाविद्यालयाना नवीन अभ्यासक्रम /विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयांनी त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅंप पेपरवर सादर करावे

३. महाविद्यालयाने हमीपत्र सादर केल्याशिवाय किंवा तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

13

४. महाविद्यालयांनी, संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक / कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

५. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (ॲफिलिएशन ऑफ कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज) रेग्युलेशन २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहित निकषांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करु नये.

७. संबंधित विद्यापीठांनी, वरील विवरणपत्रातील महाविद्यालयांनी प्रकरणपरत्वे नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा.

३. विद्यापीठांनी संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करण्यापूर्वी शासन मान्यता आदेशांचे अवलोकन केल्याशिवाय व विभागीय सहसंचालकाचे अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

४. संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रम/ विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यांचा नियतकालिक आढावा घेऊन सदर अभ्यासक्रम / विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यामध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर अभ्यासक्रम / विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यांची मान्यता रद्द समजून तसे विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत आणि ते शासन व संबंधित विद्यापीठाकडे पाठवावेत. मा. उच्च न्यायालयाच्या 'नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २४४६/२०१३ व २४४८/२०१३ मध्ये उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ व विभागीय सहसंचालक यांची राहील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०६१५१५०७०२०६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL DN: CN = PRATAP PANDURANG LUBAL C = IN S = Maharashtra O = GOVERNMENT OF MAHARASHTRA OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT Date: 2023.06.19 18:19:01 +0530

(प्रताप पां. लुबाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

14

| | | |
|---|---|---|
| ४२. | श्रम साधना बॉम्बे ट्रस्ट कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय<br>गो.बॉ.क्र. ९४, बांभोरी, जळगाव ता.धरणगाव जि. जळगाव | अतिरिक्त तुकडी<br>बी.सी.ए.-प्रथम वर्ष [१] |
| ४३. | खान्देश कॉलेज एजूकेशन सोसायटीचे एस एस मनियार विधी महाविद्यालय जळगांव<br>आय.एम.आर परिसर जळगाव ता.जळगाव जि. जळगाव | अतिरिक्त तुकडी<br>बी.ए.एल.एल.बी. (५ वर्षीय)-व्दितीय वर्ष [६०]<br>एल.एल.बी. (३ वर्षीय)-व्दितीय वर्ष [१] |
| ४४. | आर. सी. पटेल एज्युकेशन ट्रस्ट संचलित इस्टिट्युट ऑफ़ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट शिरपुर धुळे<br>करवंद नाका, शिरपूर ता.शिरपुर जि. धुळे | अतिरिक्त तुकडी<br>बी.सी.ए.-प्रथम वर्ष [१] |
| ४५. | खान्देश कॉलेज एजूकेशन सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ़ मॅनेजमेन्ट अँड रिसर्च जळगांव<br>आयएमआर कॅम्पस, डी.आय.सी च्या मागे, एन.एच.६, जळगांव ता.जळगाव जि. जळगाव | अतिरिक्त तुकडी<br>बी.बी.ए.-व्दितीय वर्ष [१]<br>बी.सी.ए.-व्दितीय वर्ष [१] |
| ४६. | पी. आर. हायस्कुल सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगांव<br>प्राचार्य, कला,वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय धरणगाव ता.धरणगाव जि. जळगाव | अतिरिक्त तुकडी<br>बी.एस.सी-प्रथम वर्ष [१] |
| | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | |
| ४७. | कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर संचलित शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. | अतिरिक्त तुकडी -<br>बी.कॉम. भाग १ (इंग्रजी माध्यम) -<br>अतिरिक्त तुकडी क्र. १ |
| ४८. | कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर संचलित शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. | अतिरिक्त तुकडी -<br>बी.कॉम. भाग २ (इंग्रजी माध्यम) -<br>अतिरिक्त तुकडी क्र. १ |
| ४९. | कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर संचलित शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. | अतिरिक्त तुकडी -<br>बी.कॉम. भाग ३ (इंग्रजी माध्यम) -<br>अतिरिक्त तुकडी क्र. १ |

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

जा.क्र.कबचौउमवि/५/विस्तार मान्यता-२०२३-२४/ डी.ओ. 5 / 264 /२०२३

दिनांक : 19-07-2023

प्रति,

**मा.प्राचार्य/मा.संचालक,**
**श्रम साधना बॉम्बे ट्रस्ट कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बांभोरी**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नविन विद्याशाखा / नविन अभ्यासक्रम / नविन विषय / अतिरिक्त तुकडी / प्रवेश क्षमतेत वाढ / विद्यार्थी संख्या वाढ विस्ताराच्या प्रथम संलग्नीकरणाबाबत

१) शासन आदेश क्रमांक मान्यता – २०२३/प्र. क्र. १०५/मशि. -४ दिनांक १५ जून २०२३

२) विद्यापीठाचे पत्र क्र. KBCNMU/05/FTA LIC २३-२४/D.O. 5/ 227 /२०२३, दि. 05-07-2023

महोदय/महोदया,

शासनाने उपरोक्त विषयी संदर्भिय क्र.०१ च्या शासन निर्णयानुसार महाविद्यालयास/परिसंस्थेस शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **नविन विद्याशाखा / नविन अभ्यासक्रम / नविन विषय / अतिरिक्त तुकडी** विस्तारास मान्यता प्रदान केलेली असून, त्याअनुषंगाने प्राप्त आदेशान्वये आपल्या महाविद्यालयाच्या विस्तारासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारा संदर्भिय पत्र क्रमांक ०२ अन्वये स्थानिक तपासणी समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर स्थानिक तपासणी समितीने आपल्या महाविद्यालयास भेट देवून विद्यापीठास अहवाल सादर केलेला असून,सदरच्या अहवालास मा. विद्या परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू महोदयांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या तज्ञ समिती तसेच स्थानिक तपासणी समितीने त्यांच्या अहवालात सूचीत केलेल्या आणि विद्यापीठाने दिनांक ०५/०७/२०२३ रोजीचे पत्र तसेच त्यासोबतच्या तक्त्या मध्ये नमूद केलेल्या अटी व त्रुटींची तसेच ह्या पत्रासोबतच्या तक्त्यातील रकाना क्रमांक टेबल-A मधील ९ ते ११ मध्ये नमूद केलेल्या त्रुटींची आणि संदर्भिय क्र. ०१ व ०२ च्या शासन निर्णयातील अटी व त्रुटींची ०३ महिन्यांच्या आंत परिपूर्ण स्वरुपात पूर्तता करण्याच्या अधीन राहून, आपल्या महाविद्यालयास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चे कलम ११० नुसार सोबतच्या तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या नविन विद्याशाखा / नविन अभ्यासक्रम / नविन विषय / अतिरिक्त तुकडीच्या / विद्यार्थी संख्या वाढ विस्तारास <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रथम संलग्नता प्रदान करण्यात येत असून, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून विद्यार्थी प्रवेशास परवानगी देण्यात येत आहे.</u>

आपल्या महाविद्यालयाच्या विस्ताराकरिता प्रदान करण्यात आलेली मान्यता ही शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एका वर्षाकरिता राहील व सदर मान्यतेचे माहे ऑगस्ट मध्ये वेळोवेळी नुतनीकरण करणे बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी. आपणास मान्य केलेले विद्यार्थीसंख्ये इतकेच विद्यार्थी आपण शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रवेशीत करावयाचे आहेत, याचीही कृपया नोंद घ्यावी. आपणास सूचित करण्यात येते की, विस्तारासंदर्भात खालील बाबींचीदेखील लवकरात लवकर पूर्तता करावी.

- परिनियम ४१५(१)प्रमाणे शासनाच्या व युजीसीच्या कार्यभारानुसार आवश्यक तेवढ्या नियमीत शिक्षकांची नेमणूक करून त्यांचे प्रस्ताव विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागास सादर करून त्यांच्या नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता घ्यावी.
- आपणाकडून अटी पूर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर व आपणांस घालून दिलेल्या अटी / त्रुटींची परिपूर्ण स्वरुपात पूर्तता झाल्यानंतरच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाबाबत / नैसर्गिक विस्ताराबाबत विचार करण्यात येईल.

करीता या पत्रात नमूद केलेल्या बाबींची तसेच सोबतच्या तक्त्यातील रकाना क्र. ०६ मध्ये नमूद केलेल्या अटी/त्रुटींची पूर्तता ०३ महिन्यांच्या आत करण्यात येऊन, आवश्यक त्या साक्षांकित कागदपत्र / दस्तऐवजांसह अटी-पूर्तता अहवाल विद्यापीठात सादर करण्यात यावा.

कळावे,

आपला विश्वासू,

(ग. ना. पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग

सोबत : विहीत नमुन्यातील तक्ता

<u>प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :-</u>

१) मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
३) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग, आकाशवाणी केंद्राच्या शेजारी, महाराष्ट्र राज्य वीज प्राधिकरण इमारत, पहिला मजला, जळगांव.
४) मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगांव.
५) मा. संगणक विभाग प्रमुख, परीक्षा विभाग, कबचौउमवि, जळगांव.
६) उपकुलसचिव / सहा. कुलसचिव, परीक्षा विभाग, कबचौउमवि, जळगांव.
७) सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता विभाग, कबचौउमवि, जळगांव
८) सहा.कुलसचिव, व्याख्याता मान्यता विभाग, कबचौउमवि, जळगांव
९) समन्वयक, विद्यार्थी सहायता ई सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगांव

---

विद्यापीठाचे पत्र क्रमांक जा.क्र.कबचौउमवि/५/विस्तार मान्यता-२०२३-२४/ डी.ओ. 6/ 264 /२०२३ दिनांक : 19-07-2023

Details of Extension Category :

| Sr. No. | Name of College | Type of Extension | | | Approval of University |
|---|---|---|---|---|---|
| | | New Faculty | New Course / Subject | Additional Division / Increase in Intake | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | [E100154] - SHRAM SADHANA BOMBAY TRUST KALA, WANIJYA VA VIDNYAN MAHAVIDYALAYA, BAMBHORI | --- | ---<br>--- | B.C.A.-FIRST YEAR [1 ADDL. DIV. ] - 60<br>--- | **First Time Affiliation is granted to the Extension Category from the Academic Year 2023-24 and student's admission as well subject to the fulfillment of the conditions as mentioned below within 03 months.**<br>A) The conditions as laid down by the University,vide its letter dated 09/02/2023 alongwith Table.<br>B) Conditions as mentioned in G.Rs dated 13/09/2017.<br>C) Other conditions as mentioned in this letter.<br>D) Following conditions as mentioned by LIC.<br>**1. Regular librarian should be appointed 2. Regular Physical Director should be appointed 3. Regular Teachers should be appointed as per the workload of additional division. 4. Books of Rupees 25000 should be purchased in Library 5. The Compliance of above conditions should be done within 3 months from the date of LIC visit 6. One man committee should be sent to check whether the compliance is done or not** |

(ग. ना. पवार)